नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/१२/२०२५ (गुरूवार )**

---

## पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :– दिनांक १०/१२/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गौडखैरी येथे काही इसम लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचत असतांना पोलीसांची चाहुल लागताच लागताच तेथील आरोपी पळुन गेले. सदर मुख्य **आरोपी चे नाव सलीम ईकबाल कुरैशी, वय ३० वर्ष, रा गौडखैरी तह. कळमेश्वर असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी घटनास्थळीची पंचासमक्ष पाहणी करून घटनास्थळावरून १) नगदी ३३७०/– रूपये २) हिरो स्प्लेंडर एम एच ४० बि एम ५३६७ किंमती ३०,०००/– रूपये ३) होंडा पॅशन एम एच ४० झेड ८५२२ किंमती २०,०००/– रूपये ४) सट्टापट्टी साहीत्य आणि इतर साहित्य असा एकुण ५३,९८०/–रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद आरोपी क्रं १) सलीम ईकबाल कुरैशी, वय ३० वर्ष, रा गौडखैरी तह. कळमेश्वर आणि त्याचे साथीदार यांच्या विरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बुट्टीबोरी** :— दिनांक १०/१२/२०२५ रोजी एमआयडीसी बुट्टीबोरी पोलीसांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, **हद्दपार इसम नामे शकील उर्फ सागिर साहाब खान, वय ४३ वर्षे, रा. बिडगणेशपुर, ता. हिंगणा, जि. नागपुर** हा त्याचे मुळगावी बिडगणेशपुर येथील घरी वास्तव्य करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा बिडगणेशपुर येथे जावुन शाहनिशा केली असता हद्दपार आरोपी शकील उर्फ सागिर साहाब खान त्याचे राहते घरी मिळुन आला. नमुद आरोपीला उपविभागिय दंडाधिकारी, नागपूर यांनी नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले असुन नमुद आरोपीने कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता हदद्पार आदेशाचे उल्लंघन करून नागपुर जिल्हयात प्रवेश केला असल्याने नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी बुट्टीबोरी येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हे नोंद केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १७ गुन्हे नोंद

दिनांक १०/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १२,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण १२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १७ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १२९६० मिली देशी दारु, ५२ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १२१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने